Nutan Vidyalaya Sevabhavi Education Society, Umri

# Late Babasaheb Deshmukh Gorthekar Art's, Commerce & Science Mahavidyalaya, Umri, Dist. Nanded (M.S.)

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
(Recognition U/S 12(B), 2 (F) of the UGC Act 1956)
*Website : www.lbdgmu.in*
*Email: lbdgcollege@rediffmail.com*

## One day Interdisciplinary National Conference

On

# "Rural Development : Issues & Challenges"

21st December 2019

Organized by

Internal Quality Assurance Cell
Late Babasaheb Deshmukh Gorthekar Art's,
Commerce & Science Mahavidyalaya, Umri

Collaboration with

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded (M.S)**

Chief Editor

**Dr. Tukaram Vaijanathrao Powale**

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Co – Editor

**Dr. Z. R. Pathan, Dr. D. D. Kolhekar, Dr. G. P. Yedle, Dr. V. V. Bhoyar**

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

## INDEX



| Sr. No | Author Name | Paper Name | Page No |
|---|---|---|---|
| 161 | डॉ. पुरुषोत्तम गाटे | दुष्काळमुक्त मराठवाडा : दशा आणि दिशा | 806 |
| 162 | श्री. मा. मा. जाधव | ग्रामीण जीवनापुढील आव्हाने आणि ग्रामीण साहित्य | 811 |
| 163 | Dr. Mousumi Choudhury | Awaiting To Be Explored: Prospects And Pitfalls Of Tourism In Karbi Anglong Districts Of Assam | 818 |
| 164 | Dr. Wadje Sadanand Rajaram | Role Of Banking In Rural Development | 831 |
| 165 | **डॉ. पायल कश्यप** | **हिन्दी साहित्य में ग्रामीण जन–जीवन और भाषा** | 833 |
| 166 | डॉ. रंजना विठ्ठलराव भोसले | क्रिडा क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासनाची गांव तेथे क्रिडांगण व व्यायामशाळा योजना | 840 |
| 167 | डॉ. तुकाराम वैजनाथराव पोवळे | ग्रामीण विकासात स्वयंसेवी संस्थांची भूमिका | 843 |
| 168 | प्रा. डॉ. नवनाथ गोविंदराव अडकिणे | जातीव्यवस्था ग्रामविकाससमोरील : एक आव्हान | 850 |
| 169 | Dr. Sandeep G. Ladkar | Rural Ethos In Kamala Markandaya's Nectar In Asieve | 853 |
| 170 | **प्रा. डॉ. देशमुख एम. व्ही.** | **शेतीचा शाश्वत विकास** | 856 |
| 171 | V. V. Bhoyar | Physicochemical Chracterization Of Soil –Near Ambona Lake | 859 |
| 172 | प्रा. डॉ. बी.आर. कतूरवार | ग्रामीण विकासाचे एक आदर्श मॉडेल – राळेगण सिध्दी | 862 |
| 173 | सिमा पोफळे व डॉ. विवेक साठे | ग्रामीण विकास आणि ग्रंथालये | 868 |
| 174 | Dr. S. L. Jadhav | Role Of Library With Reading Room Helps For Development Of Rural Area | 871 |
| 175 | Sow. Shinde Maya Udhavrao | Role Of Library In Rural Development | 875 |
| 176 | डॉ. शेख रजिया शहेनाज शे. अब्दुल्ला | मार्कण्डेय के कथा–साहित्य में ग्रामीण चित्रण | 879 |

ADAT VYAPAR DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# ग्रामीण विकासाचे एक आदर्ष मॉडेल – राळेगण सिध्दी

प्रा. डॉ. बी.आर. कतूरवार

*लोकप्रशासन विभाग प्रमुख*

*देगलूर महाविद्यालय, देगलूर*

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर केंद्र व राज्य शासनाने लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वानुसार पंचायतीराज संस्थाची स्थापना केली. बहूतांश घटकराज्यातील ही पंचायतीराज व्यवस्था जो पर्यंत मजबूत व भक्कम बनणार नाही तोपर्यंत देशाचा सर्वांगीण विकास होणार नाही. ही बाब लक्षात आल्यानंतर महाराष्ट्र राज्यातील जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी महात्मा गांधी यांच्या ग्राम स्वराज्यवरील विचारांवर आधारीत कमीत कमी एक तरी गाव असावे या उद्देशाने त्यांनी राळेगण सिध्दी हा प्रकल्प यशस्वी करून संपुर्ण भारतातील जनतेला मार्गदर्शन करण्याचे कार्य केले आहे. एकविसाव्या शतकात केवळ भारतातच नव्हे तर जागतिक पातळीकर महाराष्ट्र राज्यातील राळेगण सिध्दी या गावामध्ये करण्यात आलेले ग्रामीण विकासाचे कार्य हे एक आदर्श प्रारूप किंवा मॉडेल म्हणून विकसीत झाले आहे. आदर्श गाव कसे असावे? याचा संपुर्ण महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील प्रत्येक खेडेगावाला दिशा मिळावी म्हणून जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली या गावचे संपुर्ण चित्र बदलले आहे.

अण्णा हजारे यांनी चर्चा सिध्दांत किंवा विचार यांच्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्व दिले. मागील तीस वर्षापासून संपुर्ण भारतातील ग्रामीण विकासाला मार्गदर्शन करण्यासाठी एक मॉडेल म्हणून या गावास प्रसिध्दी प्राप्त झाली आहे. ज्येष्ठ समाज सेवक अण्णा हजारे यांनी लहाणपणापासून प्रतिकुल परीस्थीवर मात करून जीवनाला आकार देण्याचे कार्य करीत होते. या अनुभवाच्या बळावर अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील 'राळेगण' या आपल्या जन्मभुमीला दिशा देण्याचे कार्य इ.स.१९७५ मध्ये सुरू केले. त्याकाळात त्या गावातील लोक प्रचंड व्यसनाधीन होते. लोकांमध्ये परीवर्तन करण्यासाठी त्यांनी दोन गोष्टीवर भर दिला. माणसाच्या जीवनात परीवर्तन करावयाचे असेल तर सर्व प्रथम त्यांच्या भाकरीतचा प्रश्न मिटवीला पाहिजे. कारण ऊपाशीपोटी असलेल्या माणसाला कितीही दर्जेदार ज्ञान शिकवून ऊपयोग नाही. जोपर्यंत त्यांची भाकरीची भूक मिटत नाही तोपर्यंत त्यांना कांहीही सागंण्यात अर्थ नाही, ही बाब अण्णा हजार यांना लक्षात आली. त्याकाळात तेथे दारूभटी व दारू पिणारे लोक प्रचंड होते. त्यांना दारू पीऊ नका, दारू वाईट असे, असे अण्णा हजारे यांनी काधीही कुणालाही न म्हणता त्यांच्या भाकरीचा प्रश्न सोडविणे व त्यांची वैचारिक पातळी वाढविणे या दोन गोष्टीचाच विचार त्यांनी केला.

विशेष महत्वाची बाब म्हणजे कोणतेही कार्य करावयाचे असेल तर अध्यात्मिक अधिष्ठान अत्यंत आवश्यक असते. याची त्यांच्या मनाला खात्री झाली त्यामुळे राळेगण सिध्दी येथील यादव बाबाचे जूने पडके मंदीर होते त्यांचा जिर्णोध्दार करण्याचे कार्य त्यांनी केले. मंदीराच्या शेजारी एका खोलीत वास्तव्य करीत गावातील तरूणांना संघटीत केले व गावच्या सर्वांगीण विकासासाठी एक 'पंचसुत्री' विकसीत केली.

महात्मा गांधी यांच्या विचाराप्रमाणे ग्राम स्वराज्य स्थापन करण्यासाठी त्यांनी या पंचसुत्रीच्या अंमलबाजावणीस सुरवात केली. खेडेगांव जो पर्यंत स्वावलंबी, स्वंयपुर्ण व स्वयंशासीत बनणार नाही तो पर्यंत भारत महासत्तक राष्ट्र बनणार नाही. भारतातील ८० टक्के जनता खेड्यात वास्तव्य करीत असते. त्यांचे प्रश्न अधिक गंभीर आहेत. ते प्रश्न सोडवल्याशीवाय देशातील विकासाला कांहीही अर्थ नाही. जो पर्यंत खेडे हा राष्ट्र विकासाचा केंद्र बिंदू मानणार नाही. जोपर्यंत निसर्ग आणि मानव यांचे शोषण थांबणार नाही म्हणून त्यांनी ग्रामीण विकासाची पंचसुत्री मांडी आहे.

१. नसबंदी

२. व्यसनबंदी

३. कु–हाड बंदी

४. चराई बंदी

५. श्रमदान

राळेगण मध्ये जो विकास घडला आहे तो प्रदुषणमुक्त व शोषणमुक्त विकास आहे. ग्रामविकासातली ही एक महत्वाची संकल्पना आहे. त्याशिवाय पर्यावरणीय –हास थांबवून पुढच्या शंभर वर्षात आम्हाला शुध्दा श्वास घेता येणार नाही आणि पुढच्या पिढया मग आम्ही जर आज हे केले नाही तर आम्हाला क्षमा करणार नाहीत. या सर्व बाबींचा समतोल साधण्यासाठी आदर्श ग्रामरचनेत त्यांनी पाच–सुत्रांचा कार्यक्रम मांडला आहे. तो खालील प्रमाणे आहे.

१. नसबंदी

लोकसंख्येचा प्रश्न हा आज देशापुढीलच नव्हे तर जगातील सर्वांत मोठा, महत्वाचा प्रश्न आहे. आज आपल्या समोर ज्या कांही भीषण समस्या आहेत, त्या सर्वांचे मूळ लोकसंख्येत आहे. गावचा विकास करून गाव आदर्श बनवायचे असेल तर झालेला विकास लोकसंख्येच्या भस्मासूराने गिळंकृत करू नये म्हणून गावाची लोकसंख्या मर्यादित राखणे आवश्यक आहे. कारण गाव हे आपल्या राष्ट्राचाच एक नमूना आहे. लोकसंख्या वाढीचा आजचा दर जर कायम राहिला तरी अल्पावधीतच जागातील सर्वाधिक लोकसंख्या असणारे राष्ट्र म्हणून आमचे नाव घेतले जाईल. स्वातंत्र्योत्तर जो काही विकास झाला आहे तो या

Degloor College Degloor Dist.Nanded

वाढत्या लोकसंख्येने खावून टाकला आहे. पाणी, अन्न.–धान्य, निवारा इ. बाबतची अनेक गंभीर संकटे येत्या शंभर वर्षात आपल्यापुढे उभी राहणार आहेत. गाव सुखी व स्वयंपुर्ण बनवायचे असेल तर परिवार–नियोजन करून लोकसंख्या मर्यादित ठेवणे, हाच तोडगा आहे. आपल्या देशात आज कुटूंब–नियोजनाचा कायदा असता तरी कायदा करून असे प्रश्न सुटत नसतात, असा अनुभव आहे. सक्तीचे कुटूंब–नियोजन हा या सर्व बाबींबर उपाय असला तरी राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे तसे घडणे अशक्य दिसते.

त्याचमुळे प्राप्त परिस्थितीत आदर्श ग्रामरचनेतच्या निर्मीतीसाठी सर्वप्रथम परिवार–नियोजनावार भर देण्यासाठी लोकप्रबोधन करण्याची नितांत गरज आहे. तर दुस–या बाजूने जी कुटूंबे ग्रामसभेत निर्णय घेता येइल. "राळेगण" मध्ये अण्णा हजारे यांनी घेतला आहे. ग्रामीण जनतेचे अज्ञान,शंका,दूर करून तिला प्रशिक्षित करणे, सक्ती करणे इ. सर्व मार्गाचा अवलंब त्यासाठी करणे गरजेचे असते.

"राळेगण" मध्ये हे सुत्र यशस्वीपणे राबविले. त्याचमुळे गेल्या दोन दशकात झालेला आर्थिक–विकास ठळकपणे दिसू लागला. बावीस वर्षापुर्वी गावाचे दरडोई उत्पन्न २०० ते २२५ रू. होते. आज ते २१०० रू. आहे. . त्यावेळी दूध देखील मिळत नसे. आज पावणेदोन हजार लिटर दूध बाहेर चाललेय. हा सर्व ठळक आर्थिक विकास जो दिसतो, त्यामागे इतर कारणांबरोबर परिवार–नियोजन किंवा लोकसंख्या–नियंत्रण हे एक महत्वाचे कारण आहे.

२. नशाबांदी–व्यसनबंदी

"राळेगण" हे तसे दुष्काळी गाव, हाताला काम नाही, पोटासाठी पुरेसं अन्न नाही. परिस्थितीने गावातल्या माणसांना विवश कलेलं त्याचमुळे १९७६ ला ज्यावेळी त्यांनी कामाला सुरूवात केली तेव्हा येथे ४० ते ५० हातभट्टया होत्या. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून लोक काम करीत होते. त्यातूनच बरेच लोक व्यवसनी झाले होते.

पाणलोट–क्षेत्र विकासाच्या कामाचा परिणाम दिसू लागताच, लोकांना पर्यायी व्यवसाय मिळाले व मग हातभट्टीची ही अवदसा गावातून हद्दपार झाल्याशिवाय ख–या अर्थाने गावाचा विकास होणार नाही, असा विचार ग्रामसभेत मांडण्यात आला. या विचारातून नशाबंदीचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. आरंभी हातभट्टीवाल्यांना सामोपचाराने सांगण्यात आले. काहींनी ऐकले, काहींनी हातभट्टया चोरून चालूच ठेवल्या. त्यावेळी गावातले तरूण एकत्र झाले व त्यांनी अशा लोकांचे साहित्य बाहेर काढून तोडून–मोडून टाकले. हातभट्टया बंद झाल्या कांही लोकांनी दारू सोडली परंतू कांही लोक मात्र ती सोडायला तयार नव्हते. मग काहींना परत समजावून सांगितले, काहींना गावातील यादवबाबा मंदिरात शपथ देण्यात आली. तरीही कांही तिस–या टप्प्यातले नशाबाज दारू सोडायला तयार नव्हते. अशा अति नशेमुळे व्यसनाधीन झालेल्यांना भीती दाखविण्याशिवाय पर्याय नसल्याने ग्रामसभेने शेवटी कठोरपणे चौकात

खांबाला बांधून चार फटके मारण्याचा निर्णय घेतला आणि इज्जत व भीतीमुळे गाव मग नशेपासून मुक्त झाला, असे अण्णा हजारे यांनी एका मुलाखतीत सांगीतले आहे.

दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पिऊन कुणी पैलवान झाला असे उदाहरण नाही किंवा तिच्यामुळे बुध्दिमत्ता वाढते असेही नाही. या सर्व गोष्टी माहित असूनही लोक सुख,दुख, तर कधी गंमत म्हणून तिच्या नादी लागतात व शासन परमिट देऊन त्यांच्या घरांची होळी करायला मदत करते. त्याचमुळे नशाबंदी करणे आदर्श ग्रामरचनेसाठी आवश्यक बाब ठरते.

नशाबंदी बरोबरच इतर व्यसनापासून गाव मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तंबाखू, सिगारेट, बिडी ही सर्व व्यसने माणसाच्या नव्हे तर सार्वजनिक आरोग्यालाही बाधा आणतात. त्याचमुळे गावातल्या किराणा दुकानात कोणीही बिडी अथवा सिगारेट ठेवायची नाही, असा निर्णय १९८७ मध्ये ग्रामस्थांनी घेतला. तरूणाई व्यसनाधीन होते, त्याचे मूळ कारण आजूबाजूचे वातावरण दुकानात घरा–दारात जर बिडी–सिगारेट मिळाली तर एखादा तरूण ती चोरून घेईल. हळूहळू तो व्यसनी बनेल. त्याचमुळे ग्रामस्थांनी दुकानात बिडी–सिगारेट ठेवण्यास बंदी घातली. गावातील माणसांचे आणि गावाचे आरोग्य आज चांगले झाले आहे. त्याचमुळे ग्राविकासाच्या प्रक्रियेतील नशाबंदी व व्यसनबंदी हे एक महत्वाचे सूत्र अण्णा हजारे यांनी मांडले आहे.

३. कु–हाडबंदी

वरील दोन्ही गोष्टीबरोबरच गाव व शिवारात कु–हाडबंदी करणेही आवश्यक आहे. गाव हे फक्त दिसते तेवढेच नसते. काळी आणि "पांढरी" मिळून गाव बनते पांढरीचा विकास करायचा असेल तर तिचा मूळ पाया असणा–या काळाची निगा राखणे, पर्यावरणाचा समतोल ठेवणे गरजेचे आहे.

वृक्ष वाढतात तेव्हा येणारा पाऊस प्रथम वृक्षावर पडल्यामुळे पावसाच्या पाण्याची गती थांबविण्याचे काम वृक्ष करतात व त्यांच्याद्वारे पाणी हळूहळू जमिनीवर येते. मुळ्यांच्या द्वारे ते जमिनीत शिरते. वृक्षांच्या मुळ्यांनी जमिनीला जखडून धरलेलं असल्यामुळे जमिनीची धूप होत नाही. वृक्ष नसले तर पावसामुळे जमिनीची माती उकरली जाऊन पाण्याच्या प्रवाहाबरोबर ती वाहात जाते. वास्ततिक पाहाता ती माती नाही, तर ते जमिनीचे फुल (टॉप सॉईल) असते. अशी एक इंच माती तयार होण्यासाठी २०० ते २२५ वर्षे लागतात. दरवर्षी अशा प्रकारची हजारो टन माती वाहून जाते. ती थांबविण्यासाठी वृक्षलागवडी बरोबरच वृक्ष–संवर्धन व संरक्षण करणे महत्वाचे आहे. त्याचसाठी शिवारातील, शेतातील, गावातील कोणतेच झाड मुळापासून तोडू नये, असा निर्णय त्यांनी घेतला. खेड्यातील लोकांना जळणासाठी लाकुड हे लागतंच. त्यासाठी शक्यतोवर वाळलेल्या झाडाचेच लाकूड वापरावे. झाडांना त्या वा इतर कामासाठी

तोडण्यासाठी वेळ आली तर मुळापासून तोडू नये व शक्य झाल्यास कु–हाड वापरण्यासच बंदी करावी.

४. चराई बंदी

वृक्ष–संगोपनाबरोबरच शिवारातील पडीक व इतर येणा–या गवतांवर जनावरांना चराईबंदी करावी. वृक्षाप्रमाणेच गवत जेव्हा वाढायला लागते तेव्हा पावसाचा थेंब गवतावर पडतो. त्यामुळे माती उकरली जात नाही. गवताच्या मुळ्या फार खोल नसतात. त्या फक्त ७ ते ८ इंच खोल असतात. या मुळ्यांच्या द्वारे जमिनीला छिद्रे पाडली जातात व जेव्हा पाऊस पडतो तेव्हा गवतामुळे पाणी अडखळत–अडखळत वाहू लागते. त्यामुळे एकतर पाणी गाळून खाली येते व मुळ्यांच्याद्वारे जमिनीस जिरण्यास मदत होते. जोपर्यंत पक्का दगड लागत नाही, तोपर्यंत ते जिरत राहाते. त्याचमुळे गवत आपल्याला सामान्य वाटत असले तरी त्याचे कार्य मोठे असल्याने ग्रामसभेने चराईबंदी चा निर्णय अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शना खाली घेण्यात आला. राळेगण च्या आजूबाजूला आम्ही जेव्हा काम करीत होतो तेंव्हा उघडी–बोडकी राने, टेकड्या होत्या. त्या खडकावर आज गवत डोलताना दिसते. त्यामुळे माती तर त्या खडकावर आज आहेच पण त्यामुळे गावच्या एकुण जमिनीत जिरल्याने गावातल्या आर्थिक–बदलाला मदत झाली आहे.

चराईबंदी करताना प्रश्न असा येईल की, शेतक–यांची जनावरे कुठे चरतील? त्यांच्या पोटांची सोय काय? त्या प्रश्नांची उत्तरेही शोधणे आवश्यक ठरते. त्याचे सर–सोपे उत्तर असे की शेतक–यांनी जनावरांचे नियोजन करून, आवश्यकतेनुसार जनावरे सांभाळून, त्यांना चरण्यासाठी उघड्यावर न सोडता त्यांना गोठ्यातच आहार द्यावा. त्यामुळे शेणखतात जशी वाढ होईल तसचे चराईबंदी केल्यामुळे दोन ते तीन वर्षात चारा एवढा वाढेल की गावातील सर्व जनावरांना तो कापून घातला तरी पुरून उरेल. त्यासाठी आरंभी क्षेत्रात चराईबंदी लागू करावी. त्यातील फायदे दिसून आल्यानंतर इतर जमिनीवर आपोआप चराईबंदी होऊ शकेल.

५.श्रमदान

अण्णा हजारे यांच्या मते श्रमदानाचे तत्व तर ग्रामविकासाचा मूलमंत्रच आहे. श्रमदानातून जे गाव उभे राहते, त्या प्रत्येक कामाशी,ग्रामस्थाचे आपलेपणाने नाते जोडले जाते. त्याला ते काम आपले वाटते, रमदानाचा उद्देशही हाच आहे. कोणत्याही गावात लोकांच्या सहभागाशिवाय जे सरकारी वा इतर काम होते ते ग्रामस्थांना आपले वाटत नाही. दुरावा निर्माण होतो. अशा सार्वजनिक मालमत्तेच्या विषयी मग नुकसान झाले तरी कोणाला खंत वा खेद वाटत नाही, याउलट ज्यावेळी गावातील कामासाठी प्रत्येकाचा हातभार लागलेला असतो, घाम गाळलेला असतो, त्या कामाबद्दल प्रत्येकाला आस्था व प्रेम वाटते आणि श्रमदानातून तयार झालेल्या सार्वजनिक कामासाठीच्या खर्चात बचत होऊन तो पैस इतर कामासाठी वापरता येतो.

त्यामुळे राष्ट्र–उभारणीसाठी प्रत्येक गाव स्वावलंबी होणे आवश्यक आहे व असे स्वावलं केवळ श्रमदानातून येऊ शकत असल्याने श्रमदान ही ग्रामविकासाठी गुरूकिल्ली असून ग्रामविकासाचा मूलमंत्र आहे.

राळेगणसिध्दी परिवाराने प्रत्येक कामात श्रमदानाचे तत्व वापरले आहे. प्रत्येक कुटूंबातल्या एका माणसाने महिन्यातून दोन दिवस श्रमदान करावे, अशी अपेक्षा ठेवली त्यातूनच आरंभी यादवबाबांचे मंदिर, नंतर बावीस लाखाची शाळा इमारत आणि आणि वसतिगृहाची इमार, मराठी शाळेच्या खोल्या उभ्या राहिल्या अर्थात कांही ठिकाणी थोडं सरकारी मदतही मिळाली आहे. सध्या मुलांना खेळण्यासाठी दोन एकराचे मैदान तयार करण्याचे काम पुर्ण केले आहे.

वरील "पंचसूत्री" ही ग्रामविकासाच्या तत्वज्ञानातील महत्वाचे तत्व आहे. या पंचसुत्रीला आम्ही आदर्श ग्रामरचनेशी जोडले व १९८२ ला महाराष्ट्रात सार्वत्रिक रूप दिले. या पंचसूत्रीचा वापर केलातर आपल्या गावाचे "आदर्श" गावात रूपांतर होण्यास फारसा वेळ लागणार नाही. हे सर्व करीत असताना, म्हणजे या 'पंचसुत्री' चा वापर करीत असताना तारतम्य बाळगणे, काही ठिकाणी संयम, विवेक बाळगणेही आवश्यक आसते. अर्थात अनुभवाने या सर्व गोष्टी बरोबर सुचतात, असाही विचार अण्णा हजारे यांनी मांडला आहे.

संदर्भ ग्रंथ सूची–

१. ग्रामवेद – के.बी.रोहमारे ग्रंथ
२. पंचायतराज व नागरी प्रशासन – डॉ. दर्शनकार अर्जुनराव
३. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था – भारतातील स्थानिक स्वशासन विशेष
४. भारतातील स्थानिक स्वशासन विशेष – प्रा. बंग के. आर. संदर्भ – महाराष्ट्र राज्य
५. महाराष्ट्रातील स्थानिक स्वशासन – डॉ. गायकवाड टी.एन.
६. स्थानिक स्वराज्य संस्था – डॉ. यमलवाड गोविंद
७. पंचायतराज व्यवस्था – डॉ. विभूते भालबा
८. पंचायतराज व्यवस्था–नवी भूमिका – खरगे विकास
९. ग्रामीण सरकारी संघटना आणि विकाससंबंधी सरकारी दृष्टीकोन – डॉ. नामदे, प्रा.राजदेरकर

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded